अहमदनगर जिल्हा परिषद

# ग्रामिण पाणी पुरवठा विभाग

## भारत निर्माण कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | भारत निर्माण कार्यक्रम -यामध्ये केंद्रशासन पुरस्कृत वर्धित वेग पाणी पुरवठा कार्यक्रम/ स्वजलधारा योजना/ राज्यशासन पुरस्कृत महाजल योजना (किमान गरजा कार्यक्रमांतर्गत बिगरआदिवासी/ आदिवासी व विशेष घटक योजना) या लेखाशिर्षाखालील योजनांचा समावेश होतो |
| २ | योजनेचा उद्देश | १. एन.सी.गावे - १.६० कि.मी. परिसरात अथवा १०० मी.उंचीपर्यंत तसेच दरडोई १० लि.पेक्षा कमी पिण्याचे पाणी उपलब्ध नसलेली गावे अहमदनगर जिल्ह्यात अशी एकुण २० गावे आहेत<br>२. रासायनिकदृष्ट्या दुषित पाणी पुरवठा होत असलेली गावे/वाडया/वस्त्या (एकूण ४०७) अहमदनगर जिल्ह्यात अशी एकुण १५ गावे आहेत<br>३. पी.सी.गावे - दरडोई ४० लि.पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असलेली गावे/वाडया दि.१/४/२००७ रोजी एकुण २०९३ गावे/वाडयांना अपुरा पाणी पुरवठा होत होता. सन २००७-०८ मध्ये एकुण ६७९ गावे/वाडयांना जि.प. आपले पाणी व म.जि.प्रा.मार्फत पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. १.४.०८ रोजी एकुण १४८६ गावे/वाडया वस्त्यांना पाणी पुरवठा करणे शिल्लक आहे. सदर गांवे /वाडयांना मार्च २००९ पर्यंत पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट आहे.<br>४. सर्व शासकीय प्राथ.शाळांना पेयजल सुविधा उपलब्ध करणे.<br>एकुण ११७८ प्राथमिक शाळांना पाणी पुरवठा करावयाचा असून त्यापैकी ८३७ शाळांना पाणी पुरवठा करणे प्रगतीत आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | योजना कोणती आहे | केंद्र/राज्य पुरस्कृत |
| ४ | केंद्र पुरस्कृत असल्यास केंद्र राज्य हिस्सा | अ- बिगर आदिवासी क्षेत्रातील गावांसाठी केंद्रशासन/राज्य शासन ९०टक्के व लोकवर्गणी १० टक्के<br>ब - आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावांसाठी व विशेष घटक योजनेसाठी केंद्रशासन/ राज्यशासन ९५ टक्के व लोकवर्गणी ५ टक्के |
| ५ | योजनेचे घटक | संबंधीत गाव/वाडी/वस्ती |
| ६ | लाभार्थी निवडीचे निकष | १.गावे /वाडया निवडीचे निकष<br>अ - सपाट प्रदेशात १.६० कि.मी.अंतरावर व डोंगराळ प्रदेशात १०० मी.उंच अंतरापर्यंत पिण्याच्या पाण्याचा सार्वजनिक अथवा खाजगी उद्‌भव नसलेली गावे/वाडया<br>ब - जेथे पाण्याचे उद्‌भव उपलब्ध आहेत परंतु तेथील पाण्याची गुणवत्ता अयोग्य आहे अशी गावे/वाडया उदा. अतिक्षार,लोह,फ्लोराईड,अर्सेनिक किंवा इतर विषारी पदार्थांचे अतिरिक्त प्रमाण किंवा जैविकदृष्टया दूषित<br>क - जेथे पाणी पुरवठा उपलब्ध आहे परंतु विहित निकषापेक्षा कमी आहे अशी गावे/वाडया (४० लि. दरदिवशी दरडोई/दरमाणशी पेक्षा कमी)<br>२. गावे/वाडया हाताळण्यासाठी प्राथम्यक्रम<br>ग्रामीण पाणी पुरवठा योजना मागणी आधारित लोकसहभागावर आधारित राबविण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने दि.२७ जुलै २००० पासून अंगिकारले आहे. पाणी पुरवठा योजनेकरिता मागणी करणाऱ्या ग्रामपंचायती वाडयांच्या मागणी प्रस्तावांना निकषाप्रमाणे गुण देऊन सर्वात जास्त गुण मिळणाऱ्या अर्जदार ग्रामपंचायतींची प्राथम्य यादी तयार करण्यात येते. गावांना निधी उपलब्ध करुन देण्याचे प्राधान्य क्रम ठरविण्यासाठी १०० गुणांची निकष यादी दि.२३/३/२००२ च्या शासन परिपत्रकाद्वारे निर्गमीत करण्यात आली आहे. त्यामध्ये पुढील मुद्दयांचा समावेश आहे. |

| | | |
|---|---|---|
| ६ | लाभार्थी निवडीचे निकष | १. पाणी पुरवठयाचे प्रमाण - कमाल ६० गुण<br>२. पाणी टंचाई असल्याने टँकर - कमाल १५ गुण लावावी लागणारी गावे<br>३. मागासवर्गियांचे प्रमाण - कमाल ५ गुण<br>४. आदिवासींचे प्रमाण - कमाल ५ गुण<br>५. गावातील पुर्वीची पाणी - कमाल ५ गुण पट्टी वसुली<br>६. संत गाडगेबाबा ग्राम - कमाल १० गुण स्वच्छता अभियान अंतर्गत बक्षीस मिळाले असल्यास<br>वर्षातील उपलब्ध निधीनुसार योजनांचा अग्रक्रम मंजुर करण्याचा निर्णय मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदेतील जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती घेते. |
| ७ | | ३.योजनेची अंमलबजावणी<br>प्राथम्यक्रम निश्चित झाल्यानंतर योजनेच्या कामाची संपुर्ण अंमलबजावणी ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येते. यामध्ये तांत्रिक सल्लागाराची निवड करणे,अंदाजपत्रके तयार करणे त्यास ग्रामसभेची प्रशासकीय मंजुरी घेणे,निविदेची कागदपत्रे तयार करणे, निविदा जाहिरात वर्तमान पत्रात देणे , निविदा प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष छाननी करुन अंतिम निर्णय घेणे , निवडलेल्या कंत्राटदाराला कार्यादेश देणे, कंत्राटदाराच्या कामावर लक्ष ठेवणे, आवश्यकतेनुसार राज्य शासनाने ठरवुन दिलेल्या विहित पध्दतीने अथवा दरकरारानुसार योजनेसाठी लागणाऱ्या सामुग्रीची खरेदी करणे , योजनेच्या बांधकामाच्या टप्प्यानुसार देयके अदा करणे ही कामे ग्रामसभेने निवडलेल्या ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत केली जातात. |

<table>
<tr><td>८</td><td>निधी वाटप व लेखा परिक्षण</td><td colspan="3">योजनंच्या खर्चाच्या शासन सहभागाची ९० टक्के रक्कम ४५,३० व २५ टकके या प्रमाणात ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना वितरीत केली जाते. सदर रकमेमधुन व लोकवर्गणीमधुन समिती योजनेचा खर्च करते.<br>योजनेच्या खर्चाचे लेखापरिक्षण खाजगी लेखा परिक्षक व्यावसायिकांकडुन तसेच सामाजिक लेखापरिक्षण समितींकडुन करण्यात येते.</td></tr>
<tr><td>९</td><td>जिल्हा पातळीवर योजना राबविणारे अधिकारी</td><td colspan="3">कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद अहमदनगर यांनी सनिंत्रण व मार्गदर्शन करावयाचे आहे. यांजनेची संपुर्ण अंमलबजावणी ग्रामपंचायत पातळीवर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत केली जाते. जि.प.चे उपअभियंता हे तांत्रिक मार्गदर्शन करतात.</td></tr>
<tr><td rowspan="7">१०</td><td rowspan="7">निधीची तरतुद</td><td colspan="3">सन २००७-०८ साठी पुढीलप्रमाणे निधी उपलब्ध आहे.</td></tr>
<tr><td>अ.क्र.</td><td>लेखाशिर्ष</td><td>सन ०७-०८ साठी तरतूद रू. लक्ष</td></tr>
<tr><td>१</td><td>वर्धित वेग कार्यक्रम</td><td>२०२९.६१</td></tr>
<tr><td>२</td><td>महाजल</td><td>७१८.९१</td></tr>
<tr><td>३</td><td>स्वजलधारा (सन ०७-०८)</td><td>००.००</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण उपलब्ध निधी</td><td>२७४८.५२</td></tr>
<tr><td colspan="2">९/२००७ पर्यंत झालेला खर्च</td><td>५६८.७१</td></tr>
</table>